# अंत्रोली-विहीर रस्त्याच्या दर्जात सुधारणा

## ग्रामस्थांमध्ये समाधान : शासकीय निकषांनुसार काम

**सकाळ वृत्तसेवा**

वेल्हे, ता. ३० : अंत्रोली-विहीर रस्त्याच्या कामाच्या दर्जात ठेकेदाराने सुधारणा केल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. अंत्रोली-विहीरदरम्यान रस्ता जिल्हा परिषदेच्या निधीतून मंजूर झाला होता, मात्र ठेकेदार मोठ्या खडीवर केवळ बारीक खडी पसरवून रस्त्याचे काम करीत असल्याचे ग्रामस्थांच्या लक्षात आले.

माहितीच्या अधिकाराखाली माहिती मागवून या रस्त्याची निविदा रक्कम व कामाचे निकष तपासून पाहिले व ग्रामस्थांनी स्थानिक 'मनसे'च्या कार्यकर्त्यांसह रस्त्यावर उतरून निकृष्ट दर्जाचे काम बंद केले. त्यानंतर रस्त्याच्या निकृष्ट कामाबाबत 'सकाळ'मधून २३ डिसेंबर व ११ जानेवारीला छायाचित्रासह वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर आंदोलनाची तीव्रता वाढली.

याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती दिली असता त्यांनीही उडवाउडवीची उत्तरे दिली होती. त्यानंतरही संबंधित ठेकेदाराने पुन्हा आपल्याच पद्धतीने काम सुरू ठेवले होते. त्यानंतर कामगार सेनेचे जिल्हा उपाध्यक्ष संतोष दसवडकर यांच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थ व मनसे कार्यकर्त्यांनी मोर्चा काढून निवेदन देऊन रस्त्याचा दर्जा सुधारण्याची मागणी केली होती. काँग्रेसनेही या संदर्भात आंदोलन केले होते.

या रस्त्याचे काम अभियंत्यांच्या सूचनेनुसार व देखरेखीखाली शासकीय निकषाप्रमाणे सुरू असल्याने घिसर, निवी, गेव्हंडे, कोदापूर, चांदर, मोहरी, गेळगाणी, सिंगापूर या गावांच्या ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. 'सकाळ'ने प्रसिद्धी देऊन सर्वप्रथम आवाज उठविल्याबद्दल मनसेच्या कार्यकर्त्यांनी 'सकाळ'चे आभार मानले.

संतोष (अप्पा) दसवडकर यांच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थ व मनसे कार्यकर्त्यांनी मोर्चा काढल्यानंतर अंत्रोली व विहिर रस्त्याच्या दर्जात सुधारणा करण्यात आली.